# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे

सर्व्हे नं ८३२ ए, फायनल प्लॉट नं.१७८ व १७९, भांबुर्डा शिवाजीनगर, पुणे ४११ ००४.
फो.नं.०२०-२५७०५०००  ई-मेल secretary.stateboard@msbshsc.ac.in  फॅक्स नं.०२०-२५६६५८०७

## परिपत्रक

परिपत्रक क्र.रा.मं./संशोधन/विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या (दिव्यांग) विद्यार्थ्यांसाठीच्या विषय योजनेबाबत/ मूल्यमापन योजना /५२८८ पुणे, दिनांक :१८ ऑक्टोबर, २०१७

विषय - माध्यमिक स्तरावरील इ.९वीच्या विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या (दिव्यांग) विषययोजना व मूल्यमापन योजनेच्या कार्यवाहीबाबत.

संदर्भ - १. शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण २०१५/(११९-अ)/एस.डी.६, दि.०८ जानेवारी,२०१६

२. शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण २०१५/११९-अ/एस.डी.६, दि.१५ फेब्रुवारी,२०१६

३. शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण २०१६/प्र.क्र.१९५/१६/एस.डी.६, दिनांक ११ जानेवारी, २०१६

४. या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक : क्र.रा.मं./पापुअ/पापुई/संशोधन/इ.९वी पुनर्रचित अभ्यासक्रम, विषययोजना व तासिका नियोजन/२२२७, दिनांक २७/४/२०१७.

५. या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक : रा.मं./पापुअ/पापुई/संशोधन/इ.९वी पुनर्रचित अभ्यासक्रम/ मूल्यपान योजना/ ३६२५, दिनांक १२/७/२०१७.

६. या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक : क्र.रा.मं./पापुअ/पापुई/संशोधन/इ.९वी पुनर्रचित अभ्यासक्रम / विषययोजना, तासिका नियोजन व मूल्यमापन योजना/ ३९६०, दिनांक २८/७/२०१७.

७.या कार्यालयाचे परिपत्रक क्र.रा.मं./संशोधन/विशेष गरजा असलेल्या (दिव्यांग) विद्यार्थ्यांसाठीच्या विषय योजनेबाबत/ मूल्यमापन योजना/४३४३ पुणे४,दि.१८/०८/२०१७.

८.शासन पत्र क्र.संकीर्ण-२०१६/(२४९/१६)/एसडी-४, दि.६ ऑक्टोबर, २०१७.

या परिपत्रकाद्वारे महाराष्ट्र राज्यातील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा प्रमुखांना / मुख्याध्यापकांना कळविण्यात येते की, इ.९वीसाठी विशेष गरजा असलेल्या दृष्टीबाधित, अध्ययन अक्षम, कर्णबधिर, बहुविकलांग (स्पॅस्टिक), ऑटिस्टिक (स्वमग्न), सेरेबल पाल्सी, मतिमंद, गतिमंद इत्यादी दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी मंडळाने विषय योजना, अभ्यासक्रम तयार केला आहे. तसेच उपरोक्त संदर्भीय परिपत्रके आपणांस यापूर्वीच पाठविण्यात आलेली आहेत. विशेष गरजा असलेल्या "दिव्यांग" विद्यार्थ्यांसाठी अनेक सोयी सवलती मंडळाने यापूर्वीच वेळोवेळी उपलब्ध करुन दिलेली आहेत हे आपणांस विदित आहेच.

कर्णबधिर, अंध, अपंग, दृष्टीदोष असलेल्या व अध्ययन अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांना "गणिताबरोबर (७६) (इ.७वीचे अंकगणित)". "कार्यानुभव" विषय घेण्याची सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे. "अंध" विद्यार्थ्यांना फक्त "गणिताबरोबर" "कार्यशिक्षणाच्या विषयातील कोणताही एक विषय" घेता येईल. "कर्णबधिर" विद्यार्थ्यांना "दोन भाषांऐवजी" व "गणिताबरोबर" "कार्यशिक्षण या विषयातील कोणताही एक विषय" प्रत्येक विषयाला पर्याय म्हणून घेता येईल. "बहुविकलांग" विद्यार्थ्यांना "दोन

कोणताही बदल करण्यात आलेला नाही. शरीरशास्त्र भाग-१ ३० गुण, गृहशास्त्र ३० गुण, प्रयोगपरीक्षा २० गुण, २० गुण कृतिपुस्तिका याप्रमाणे एकूण १०० गुणांची राहील.

सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता ९वीच्या "कार्यशिक्षण" या विषयाची कार्यवाही करण्यात यावी, तसेच सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून इ.१०वीच्या "कार्यशिक्षण" या विषयाची कार्यवाही करण्यात यावी.

तरी, आपल्या माध्यमिक शाळेतील शिक्षक, विद्यार्थी, पालक यांच्या निदर्शनास सदर बाब आणावी. परिपत्रकानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. सदर परिपत्रक मंडळाच्या www.mahahsscboard.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

(कृष्णकुमार पाटील)
सचिव
राज्यमंडळ,पुणे ४.

क्रमांक पुविम/डीपी/परिपत्रक/ 1773
पुणे ४११००५
दिनांक २३/१०/२०१७

प्रति,

प्राचार्य ,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा,
जिल्हा पुणे,अहमदनगर,सोलापूर

उपरोक्त राज्य मंडळाच्या परिपत्रकाची नोंद घेण्यात यावी, तसेच सदर बाब सर्व संबंधित शिक्षक,विदयार्थी यांचे निदर्शनास आणून देवून दर्शनी भागावर प्रसिध्द करावी व योग्य ती आवश्यक कार्यवाही करुन अंमलबजावणी करण्यात यावी.

24/10/2017
विभागीय सचिव
पुणे विभागीय मंडळ
पुणे४११००५.

custody vibhajan 2016